
# APH PUBLISHING CORPORATION

4435-36/7 ANSARI ROAD
DARYAGANJ, NEW DELHI-110 002
Tel.:011-23274050/9810121903/9810136903/9818581487
E-Mail:aphbooks@gmail.com
(Publishers of Educational Journals and Books for last 45 years)

## CERTIFICATE OF APPRECIATION

This certificate is awarded to Narendra Vasant Raghatate
बुद्धाचा धम्म आणि [illegible]
for contributing their Article/Research Paper in our Journal EDUCATION TIMES
ISSN 2319-8265 Volume No. IX Issue Number 12 for month/year
Jan 2018




Place of Issue-New Delhi

APH PUBLISHING CORPORATION
4435-36/7, Ansari Road, Darya Ganj,
New Delhi-110002

Authorized Signatory
APH PUBLISHING CORPORATION
NEW DELHI

Scanned with CamScanner

Vol. IX
Number-12

ISSN [illegible]9-8265
(Special Issue) January, 2018

UGC Number-62976

# EDUCATION TIMES

## A Multidisciplinary International Peer Reviewed Journal

APH PUBLISHING CORPORATION

Scanned with CamScanner

ISSN : 2319-8265

# EDUCATION TIMES

## A Multidisciplinary International Peer Reviewed Journal

Vol. IX, Number - 12

January, 2018

(*Special Issue*)

*Chief Editor*

**Dr. S. Sabu**

Principal, St. Gregorios Teachers' Training College, Meenangadi P.O., Wayanad District, Kerala-673591. E-mail: drssbkm@gmail.com

*Co-Editor*

**S. B. Nangia**

**A.P.H. Publishing Corporation**

4435–36/7, Ansari Road, Darya Ganj,

New Delhi-110002

Scanned with CamScanner

# CONTENTS


Phytochemical Characteristics of the Essential Oils Extracted From Hydnocarpus Wightianus Seeds Collected From Various Sacred Groves of Kerala State 1
***Sajith S.***

Impact of Artificial Intelligence in Banking and Financial Service Sector 4
***Dr. Sunil Gehlot***

A Study on Customers Attitude Towards Online Shopping in India and its Impact 9
***Dr. Rahul S. Kharabe***

Women Empowerment 13
***Dr. Meenu Vishnoi***

Bit Coin: A Peer-to-Peer Electronic Cash System 17
***Dr. Rahul S. Kharabe***

Entrepreneurial Attitude Among Commerce and Management Graduate Students 24
***Dr. Prajisha Kayalatt***

Impact of Make in India Campaign on the Indian Economy 31
***Dr. Rahul S. Kharabe***

Larkin: A Movement Poet in English Poems 37
***Dr. Anuradha Singh and Dr. Ashutosh***

A Study of Trainee Students Response and Ideal Behaviour in the Classroom Environment 41
***Md. Sadre Alam***

Performance Assessment in Elite Football Players: Field Level Test Versus Spiroergometry 51
***Dr. Zakir S. Khan***

The Novels of Graham Greene: His Narrative Skill 57
***Dr. Sangeeta Arora***

A Study of Impact of Organizational Climate on Adjustment Level of College Teachers in Lucknow City 62
***Dr. Brijesh Chandra Tripathi***

Harmful Chemicals in Artificial Food Preservatives 70
***Dr. Bineeta Yadav***


Scanned with CamScanner

Nawab Abdul Latif: A Traditionalist Modern Reformer of the Nineteenth Century 73
***Md. Ginnatulla Sk.***

Accreditation System in Diagnostic and Research Laboratories: Brief study 78
***Dr. Navneet Kumar R. Singh***

Indian Music as a Career Option-Newly Emerging Trends and Traditional Employability 80
***Dr. Vandana Sharma***

Indu's Search for Self-Identity in Roots and Shadows 86
***Dr. Mahadeo Raghunath Jare***

Beauty as the Guiding Principle in Rabindranath Tagore's Poetry 91
***Dr. Madhu Jain***

On a Structure Defined by a Tensor Field F($\neq$ 0) of Type (1,1) Satisfying aF2 + bF + cl = 0 95
***Kaushal Kumar Bajpai***

"Spaces" and "Shadows": Analysis of the Narrative Technique in Amitav Ghosh's Shadow Lines 106
***Surbhi Khurana***

Human Trafficking in Pre-Modern India: A Study of the Institution and the Modes of Slavery 109
***Dr. Manu Jayas***

Impact of Socio-Economic Status of Parents on Study Habit of Secondary School Students 114
***Mr. Prasanna Kumar Gouda, Dr. Minati Rani Mohapatra and Dr. Dibakar Sarangi***

Past, Present and Future of Multidimensional Education 118
***Jayarama Reddy***

The Indian Perspective of Trafficking of Human Organs 130
***Dr. Puja Makhijani***

'बुध्दाचा धम्म आणि दहशतवाद': एक अध्ययन 138
***Dr. Narendra Vasant Raghatate***

'अहिंसाके पुजारी' महात्मा गांधीः एक चिंतन 143
***Dr. Narendra Vasant Raghatate***

मुक्तिबोध की कहानियों में सामाजिक चेतना 149
***प्रा. डॉ. श्यामप्रकाश आ. पांडे***

Scanned with CamScanner

# 'बुध्दाचा धम्म आणि दहशतवाद': एक अध्ययन

Dr. Narendra Vasant Raghatate*

सुमारे 2500 वर्ष जूना बौध्द धर्म जगातला सगळयात जुना व प्रभावशाली धर्म म्हणून ओळखला जातो. इतर ध र्माच्या तुलनेत बौध्द धर्माचे मुलभूत तत्व अहिंसा व सद्भावना हे मानव जातासाठी वरदान ठरलेले आहेत. बौध्द धर्म प्रेम, दया, अहिंसा शांती, आदर व श्रध्दा त्यावर आधारलेले आहे. प्रत्येक व्यक्ति जर आपल्या जिवनात शांततेत राहत असेल तर स्वाभाविकच आहे की, जगात सर्वत्र शांतता प्रस्थापित हायला हवी : असे असूनही आज जगातील अनेक समस्यांनी आपण ग्रस्त आहोत त्यातील एक महत्वपूर्ण समस्या म्हणजे दहशतवाद: दहशतवादाच्या उगम हा मनुष्याच्या मनातल्या अशांत व विकत प्रवृत्तितुन होतो. हयाचे रूपांतर भौतिक व अभौतिक हानी ओढवून मानवाला भयभीत, चितीत, असुरक्षित व निराश बनवितो. त्याची आंतर बाहय कारण मिमांसा करणे अनिवार्य झाले. आहे. म्हणूनच बौध्द धर्म दहशतवादावर एक उत्तर होऊ शकेल का ? हे पाहण्यासाठी दहशतवाद काय आहे? त्याचा मानवावर, विश्वाभर होणार प्रभाव काय ? ते बघु

21 व्या शतकात अत्यंत विकसीत जीवन जगत असतांना जनसामान्यांच्या मनावर दहशतीचे सावट आढळते. छुपे लढे व दहशतवाद ही 20 व्या शतकाच्या उत्तरार्धात उदयास आलेली व फोफावलेली समस्या आहे. राष्ट्रिय व आंतरराष्ट्रिय स्तरावर दहशतवादी कारवाया करणारे लोक मोठया निष्ठेने हे करत आहे असे दिसते, त्यांना ही निष्ठा मिळते तरी कोठून ? त्यांच्या भूमिकेमागे नेमके कोणते तात्विक अधिष्ठान आहे ? आणि त्यास खरच तात्वीक अधिष्ठान म्हणता येईल का ? प्रत्यक्ष व्यवहारात येताना त्यांचे हे तत्व कसे समोर येते ? सर्व प्रश्नांची उत्तरे दहशतवादाचे समर्थन किवा विरोध करतांना गरजेचे ठरते.

## दहशतवाद

दहशतवाद हा शब्द जमततवतश या इंग्रजी शब्दाला मराठी पर्याय म्हणून प्रचलित आहे.

'Terror' हा शब्द 'Deterror' या लॅटिन शब्दापासुन तयार झालेला असून याचा अर्थ 'थरकाप उडविणे', अथवा 'घाबरवने', असा होतो. सन झू या चिनि तत्ववेत्याने 2500 वर्षापर्वी म्हटले होते, 'Kill one frightened thousand' म्हणजे 'एकाला मारा दहा हाजारांना भयभित करा'.

दहशतवादाचे मुळ मात्र मानवी मनात असणाऱ्या भितीत व असुरक्षिततेच्या भावनेत असल्याचे दिसून येते. आपले अस्तित्व राखण्याच्या व सिध्द करण्याच्या हा अत्यंत विकृत व कृरमार्ग आहे. 20 व्या शतकाच्या उत्तरार्धात उगमास आलेल्या दहशतवादास कोणतेही उच्च नैतिक व राष्ट्रिय उद्दीष्ट नाही. केवळ सत्तेचा हव्यास, अपयशांमुळे आलेले नैराश्य, व्यक्तिगत सूड भावना, गटाचा स्वार्थ, धार्मीक मूलतत्ववाद अशा संकुचित व हिंसक विचारांने दहशताद निर्माण केल्याचे दिसुन येते.

*Assistant Professor, HOD, Dept. of Philosophy, Shri Binzani City College, R.T.M. Nagpur University, Nagpur (M.S.),
E-mail: raghataten77@gmail.com



Scanned with CamScanner

## दहशतवाद

### व्याख्या

दहशतवादास व्याख्येच्या सुत्रात बांधयचे झाल्यास त्याचा मुळ गाभा पाहावयास हवा, तो असा –

1. 'Terrorist acts which result in mass murder can additionally be defined as crimes against humanity'.
2. राज्या विरूध्द केलेला अपराध किंवा विशीष्ट व्यक्ति, विशीष्ट समुह किंवा सर्वसाधारण लोकांच्या मनात हेतु पुरस्सर दहशत निर्माण करण्याच्या दृष्टिने केलेली योजनाबध्द गुन्हेगारी कृती म्हणजे दहशतवाद होय.
3. सामाजीक शास्त्र कोशानुसार, दहशतवाद ही एक अशी पध्दती आहे की ज्याद्वारे एक संघटित समुह किंवा पक्ष आपल्या प्रकट उद्येश्यांच्या प्राप्तकरिता प्रामुख्याने हिंसेचा योजनाबध्द पध्दतीने उपयोग करतो.

   अर्थात एखादे कृत्य दहशतवादी ठरवितांना गटाचे उद्यीष्ट कोणते व कोणत्या मार्गांचा महत्वाचे ठरते.
4. मराठी विश्वकोषानुसार, दहशतवाद हा याच्या अर्थाने 'वाद' म्हणजे तत्वप्रणाली नाही पण एका विशिष्ट तत्वप्रणालीतील एका पंथाने पुरस्कारलेली आचार प्रणाली असे त्याचे वर्णन करता येईल. तात्वीक दृष्टिनने मात्र अराज्यवादाच्या एका शाखेच्या तो कृतिरूप अविष्कार होय.

## दहशवादाचे स्वरूप

दहशतवादाचे स्वरूप पाहतांना ते तिन अंगानी पाहावे लागेल. कार्यप्रणाली, प्रकार व त्याचा स्तर ते पुढील प्रमाणे. –

- **दहशतवाद :- कार्यप्रणाली :-** दहशतवादी आपले दहशत निर्माण करण्याचे कार्य करण्यासाठी नित्य नवे मार्ग शोधत असतात. परंतु त्यांच्या उपलब्ध कारवायांवरून त्याचे काही स्वरूप सांगता येईल, ज्यात हत्या करणे, अपहरण, ब्लॅकमेल, करणे बॉम्बस्फोट घडवून आणने, आत्मघातकी पथके तयार करणे, सामुहीक हत्या घडविणे, जनजिवन विस्कसित करणे, शासन व्यवस्था व अर्थ व्यवस्था खिळखिळी करणे. अशा अनेक विध्वसंक गोष्टिंचा समोवश होतो.
- **दहशतवाद : प्रकार :-** आंतरराष्ट्रीय दहशतवादाचे स्वरूप पाहता तो धार्मिक दहशतवाद आहे असे दिसते. मात्र तज्ञांच्या मते, दहशतवाद हे भांडवलशाही, साम्राज्यशाही, व धार्मिक मूलतत्ववादाचे अपत्य आहे. दहशतवादाचे राजकिय दहशतवाद, सामाजिक दहशतवाद, धार्मिक दहशतवाद, आर्थिक दशहतवाद, सांस्कृतिक दहशतवाद, असे अनेक प्रकार सांगता येतील.
- **दहशतवाद : स्तर :-** दहशतवाद हा एका व्यक्तिचा, एका समुहाचा, एका राष्ट्राचाही असु शकतो. एखादया व्यक्तिचे दहशतवादीचे कृत्य हे त्याचे, त्याच्या समुहाचे असुन ते राज्य, राष्ट्र वा जागतीक स्तरावरचे असु शकते. दहशतवादी कृत्यांची व्याप्ती वाढत गेली म्हणजे तो राष्ट्रिय वा आंतरराष्ट्रिय स्तरावरिल दहशतवाद बनतो.

दहशतवादी भावनेची मुळ अगदी पुराण काळात दिसतात. दहशतवाद हे वैपल्य व भ्याडपणातुन योणारे कृत्य असते. शत्रुची सामोरसमोर युध्द नितीने भिडणे शक्य नाही याची स्पष्ट जाणिव झाली की याचा आधार

Scanned with CamScanner

घेतला जातो. पुराण काळात अश्वत्थाम्याने पांडवपुत्रांची (अभुमन्युची) केलली हत्या हे याचे समर्पक उदाहारण असु शकते.

सध्या जग हे खुप साऱ्या वैश्विक समस्यांनी ग्रासले आहे. जसे – गरिबी, लोकसंख्या वृध्दी, पर्यावरण ऱ्हास व हया समस्यांना आपण सर्वसामान्यपर्यंत नेऊन उजागर करायला हवे. कोणतीही एकटा धर्म म्हणा किंवा राष्ट्र म्हणा या समस्यांशी झुंज देण्यास समर्थ नाही. हे दर्शविते की आपण एकमेंकावर किती अवलंबीत आहोत.

जिवनाचे सर्वोच्च धैय्यच शांती हे आहे. कोणालाही अशांती किंवा युध्द सदृश्य परिस्थीती आवडणार नाही. पण तुम्ही पाहू शकता की, समाजात असेही व्यक्ती दिसतील की ज्यांना अश्या विकृत कृत्या करायला आवडतात व ते समाजात अशांती पसरवीतात. जर त्यांनी सतत शांतीचा अनुभव घेतला असता तर त्यांनी हा मार्ग कधी निवडलाच नसता. शांती ही सर्व उन्नतीची जननी आहे, ज्याच्या नसन्याने एकहि व्यक्ती किंवा राष्ट्र उन्नती किंवा भरभराटी करू शकत नाही. शांती ही वांछनीय आहे. ज्याच्या नसन्याणे सर्व मानवजात किंवा राष्ट्र उध्वस्त होऊ शकते.

कोणतेही वाईट कर्म करू नये. फक्त शुध्द कर्म करावी आणि आपल्या चित्ताला शुध्द करावे, ही शिकवण बुध्दाची.

किती सोपी व सरळ शिकवण बुध्दाने मानवजातीच्या कल्याणाकरिता दिलेली आहे. गौतम बुध्दाला बोध ीसत्व प्राप्त झाल्यानंतर त्यांनी हया तत्वांचा सातत्याने पचार व प्रसार केला.

आधुनिक परिक्षेत्रात राष्ट्रिय व आंतरराष्ट्रिय स्तरावर बौध्द तत्वज्ञान व सामाजिक एकोपा यात फार मोठे मूल्य व महत्व आहे. गौतम बुध्दांचे विचार जे त्यांया काळात म्हणजे सुमारे 2500 वर्षापुर्वी जेवढे तंतोतंत व उपयोगी होते आजही तेवढेच उपयोगी आहेत. मानव सातात्याने भौतिक सुखाच्या लोभात पडलेला आहे. त्याचे सर्व दुःख भोग हे त्याच्या अज्ञानात दडलेले आहे. अज्ञान जे तृष्णेला जन्म देते व तृष्णा मानवास भोगी किंवा शत्रु बनविते. नकारार्थी भावना जसे – वासना, लोभ, मोह, मत्सर, मानवाच्या मनात निर्माण होतात. बौध्द त्यांना अग्नि ;थ्यतमद्ध असे म्हणतात. जसे – रागाची अग्नि, तिरस्काराची अग्नि, मोहाची अग्नि. व हा अग्नि सतत मानवाला जाळत, पोखरत असतो. जर या अग्निला समजुन त्याच्या कारणांचा शोध घेऊन शमविण्याच्या प्रयत्न केला तर आपल्या मनातील सर्व वाईट भावना हया निघुन जाईल व मन निर्मळ होईल. बौध्दांच्या द्वादश निदानाद्वारे, ब्रम्हविहार ज्यात मैत्रि, करूणा, मुदिता व उपेक्षा सारखे तत्व आहे. अष्टांग मार्गावरद्वारे पंचशिलाद्व ारे मानातील सर्व वासना हया निघून जाईल. जसे – गौतम बुध्दाने अंगूलिमाल जो एक खुप मोठा दरोडेखोर होता त्याला साधु बनविले. याचप्रकारे बौध्द तत्वाज्ञानामुळे आणि बौध्द जिवन प्रणालीद्वारे आतंकवाद आणि यासारख्या ईतरही समस्या अशाप्रकारे आपण संपवु शकतो.

बुध्द मतप्रवाह हा धर्म आहे जो स्वमुक्तीवर प्रकाश टाकते. तसेच तो कर्म सिध्दांतावर विश्वास ठेवतो. कर्मसिध्दांत संक्षेपात मानतो की, कर्माला सकारात्मक तसेच नकारात्मक परिणाम असतात. तसेच हिंसा जी एकदम नकारात्मक प्रभाव निर्माण करते. ज्ञानाद्वारे अज्ञान म्हणजे नकारात्मक भावना दुर करून सकारात्मक सात्विक भावना निर्माण करू शकतो.

Scanned with CamScanner

21 व्या शतकात जगात खुप महत्वाच्या सक्रिय चळवळी निर्माण झाल्यात. तिबेटमधील बौध्दमतवादी दलाईलामा, जे पवित्र व संथापक तिबेटियन बौध्दमत, ते पन्नास वर्षापासुन आपल्या प्रदेशाला चिनच्या वर्चस्वापासुन वाचवित आहेत व तेही शांततेच्या व अहिंसेच्या मार्गाने. जरि त्यांच्या प्रयत्नांना अजुनतरी पूर्णपणे यश आलेले नसले तरी तो एक आदर्श आहे साऱ्या जगाकरिता. व याचा परिणाम म्हणून जगातील मोठ मोठया देशात बुध्दाचा आदर्श, तत्वज्ञान, विचार, मतप्रवाह पसरत आहे व ते यास मानत आहे. जसे फ्रांस, ऑस्ट्रेलिया, ग्रेट ब्रिटन, आणि अमेरीका. त्या सर्वांनी स्वेच्छेने व धैर्याने हिंसा व युध्द या महत्वाचा मुद्यांना घालविने या मुलभुत गोष्टिंवर जोर दिला आहे.

आज प्रश्न निर्माण झाला आहे की, अत्याधुनिक समाजात कोणता धर्म आपली एकात्मका आणि अखंडता अबाधित राखु शकेल. या प्रश्नाच्या उतारापर्यंत येण्याकरीता आपणास सर्व धर्मांच्या इतिहासचा अभ्यास करावा लागेल. जसा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला होता. ते वर्णन करतात की. बुध्दाची शिकवण सामाजिक प्ररिप्रेक्षात समानता निर्माण करण्याकरिता एकदम तंतोतंत आहे त्यांचे तत्व हे भरिव परिपूर्ण तसेच वैज्ञानिक कारणमिमांसेवर आधारित आहेत यावरून असे आढळते की, इतर धर्मांच्या तुलनेत बुध्दमतात, धर्मात, या वरिल समस्यांच्या सोडवणूकीसाठी व्यापक समर्पक उपाययोजना आहे.

गौतम बुध्दाला असे आढळले कि, जगात परिवर्तन आहे. प्रत्येक गोष्ट सतत बदलत आहे. यावरून एक अढळ सत्य निर्माण होते की, परिवर्तन हा जगताचा नियम आहे. पण फक्त परिवर्तनाचा नियमच परिवर्तीत होत नाही. यावरून एक निष्कर्ष की,. मानवी दुःख, त्रास, दैनावस्या ही सुध्दा बुध्दाच्या मार्गाने बदलू परिवर्तीत होऊ शकते.

बौध्द तत्वज्ञानाचा सर्वात महत्वाचा व नैतिक सिध्दांत म्हणजे जिवनाप्रति आदर आणि अहिंसा म्हणजेच दुसऱ्याची जिव हत्या न करणे. सर्व साधारणपणे बोलायचे झाले तर सर्वांनाच जिवन जगण्याची इच्छा असते व ते मृत्यूला भितात. तसेच दुसरे मुलभूत तत्व म्हणजे जगात शांती प्रस्थापीत करणे होय. शांतता प्रस्थापित करण्याची प्रथम पायरी म्हणजे त्यांच्य कारणांचा शोध घेणे होय. शांत चित्त एक शांत संभाषण करते आणि त्यावरून एक शांत कार्य घडते. तसेच बौध्द तत्वज्ञानाचे एकदम गाभ्यातील तत्व म्हणजे प्रेमाला महत्व, परार्थ विचार. इतिहास दाखवितो की, बौध्द धर्माला सोडून दुसऱ्या कोणत्याही धर्माने मानवी समाजाकरिता व्यावहारीक दृष्टिकोण स्विकारला नाही.

बौध्द मत हे बुध्दप्रामाण्यवादी आणि कारणिक आहे. मानवजातीला मदत करण्याकरिता एक सकारात्मक आणि चांगले जिवन जगण्याकरिता भरिव व भक्कम पाया पुरविते. बुध्द तत्वज्ञान हे एक प्रशंसनिस दिपस्तंभाप्रामाण े मानव जमातीला शांतीकरिता, आनंदाकरिता आणि शाश्वततेसाठी मार्गदर्शन करतो. बुध्दाची शिकवन सर्व मानवजातीवर एक भरिव प्रभाव करून जाते. त्यांच्या उपदेश हा जगात बिना हिंसा करता किंवा रक्ताचा एक थेंब सुध्दा न सांडवता दिल्या गेला व ही एक उल्लेखनिय नोंद आहे. ज्याला जगाताच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहील्या जायला हवे.

आजच्या जगात जर युध्द भडकले तर ते एका सेंकदात सर्व जग भस्मसात करेल उदा. हिरोशीमा आणि नागासाकी. ते आता पुरे ! हे सर्व जगाने ओळखले आहेत. आज सर्व जगच शांततेचा पुरस्कार करतांना दिसुन येतो कारण जीवन जगतांना त्याची अत्यंत गरज आहे. जागतिक शांतता ही दुसरी तिसरी काही नसून मानवा

Scanned with CamScanner

मानवात स्वातंत्र्य, शांतता, सहिष्णूता आणि आनंद होय. जो बौध्द तत्वज्ञानावर विश्वास ठेवतो तो यावर विश्वास ठेवतो की, जागतीक शांतता तेव्हाच प्रस्थापित होऊ शकते जेव्हा की वैयक्तिक स्तरावर प्रत्येक व्यक्तिच्या मनात शांतता निर्माण होईल आणि नकारात्मक विचार राग आणणाऱ्या भावनांना निर्माण करतात जे युध्दाचे कारण आहे. तेव्हा हे आवश्यक आहे की,आपण त्या नकारात्मक भावना आपण प्रेम, सद्‌भावना सहिष्णूतेच्या सकारात्मक भावनांनी बदलवयास हव्या.

या सर्व विचार विमर्शावरून आपण एकच समजु शकतो की, शांततेसाठी प्रत्येक व्यक्ति वैयक्तिरित्या जवाबदार आहे, जे की त्याच्या स्वतःच्या मनात, समाजात, राज्यात, राष्ट्रात आणि अंतिमतः असे करित करित विश्वात निर्माण होऊ शकते. वैयक्तिक शांतता निर्माण करण्याकरिता सर्वात चांगला उपाय म्हणजे स्वतःला शांत ठेवणे, वैचारीक बनविणे आणि सर्व मानव जमातीकरिता सहिष्णू बनणे व या करिता तुम्ही कोणत्याही धर्माच्या शिकवणीची मदत घेऊ शकता. आता काळाची गरज आहे की, आपल्यातील प्रत्येकाने त्याच्यातील शांततेला जाणले पाहिजे हिच तर बुध्दाची शिकवण आहे.

## संदर्भ ग्रंथ

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर – 'भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म' (सिध्दार्थ प्रकाशन, मुंबई, 1982)
2. श्रीनिवास हरी दिक्षित – 'भारतीय तत्त्वज्ञान' (फडके प्रकाशन, कोल्हापूर)
3. प्रा. मनोहर जिल्हे – 'धर्मांतर झाले, धम्मक्रांती कुठे आहे?' (कौशल प्रकाशन, औरंगाबाद, 2006)
4. डॉ. टी. जी. गेडाम – 'धर्मांतर' – (2006)
5. सा. प्रबुध्द भारत, मुंबई, शनिवार, 31 ऑगस्ट 1975
6. सा. प्रबुध्द भारत, मुंबई, शनिवार दि. 17 नोव्हें. 1956, पृ. क्र. 4
7. कोषकर्ते स. मा. गर्गे, प्रा चि. ग. घांगरेकर, प्रा. र. घ. वराडकर आणि एस. क्षीरसागर – 'पाश्चात्य व भारतीय राजकीय विचार' (सागर पब्लिकेशन्स, पुणे 2004)

Scanned with CamScanner